साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११०

दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.sahsik.com




वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम,यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, दिल्ली व मुंबई येथुन एकाचवेळी प्रकाशित ...!

वर्ष : १३ अंक : २०९ सोमवार २४ फेब्रुवारी २०२० मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार (पृष्ठ -८) मूल्य : ३ रुपये

### दिनविशेष
* जागतिक मुद्रण दिन

### सुविचार
जगाच्या रंगमंचावर असे वावरा की, तुमची भुमिका संपल्यावर सुद्धा टाळ्या वाजत राहील्या पाहीजे.

### चारोळी
मला विसरण्याची
तुझी सवय जुनी आहे
तुझ्या आठवणीत
माझी रात्र सुनी आहे.

### हसा जरा जपून..
**मी पुन्हा येईन**
बारावीच्या परीक्षेचा पहिला दिवस
**बाबा :** पेपर कसा होता
**मुलगा :** खूपच अवघड होता एकही उत्तर येत नव्हते
**बाबा :** मग काय लिहिलंस?
**मुलगा :** मी पुन्हा येईन...

# न्या. रंजीत मोरे यांना महाराष्ट्राबाहेर पाठविल्याच्या निर्णयामुळे जनता व वकील संघटनांमध्ये आनंदोत्सव


**रशीदखान पठाण**
**राष्ट्रीय सचिव -मानव अधिकार सुरक्षा परिषद**

* मा. सरन्यायाधीश श्री. शरद बोबडे यांना पाठविले आभारपत्र
* इंडियन बार असोसिएशनने केली होती तक्रार
* गरीबांना सुनावणी नाही व श्रीमंतांना त्वरीत सुनावणी, गरीबांच्या याचिकांवर बेकायदेशीर आदेश देत असल्याची पुराव्यासह दिली होती तक्रार
* मेघालय उच्च न्यायालयात बदली
* न्या. झेड. ए. हक व न्या. डी. एस. नायडू यांच्या बदलीचेही स्वागत

***विशेष प्रतिनिधी/ २३ फेब्रुवारी***

**मुंबई :** येथील मुंबई उच्च न्यायालयाचे वादग्रस्त न्यायाधीश रंजीत मोरे यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यासाठी इंडियन बार असोसिएशनतर्फे पुराव्यांसहीत दिलेल्या तक्रारीनंतर झालेल्या घडामोडीत मा. सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी न्या. रंजीत मोरे यांची महाराष्ट्राबाहेर मेघालय न्यायालयात बदली केल्याच्या निर्णयाचे सामान्य जनता व विविध वकील संघटनेने आभार व्यक्त केले आहे. त्याशिवाय इंडियन बार असोसिएशन तर्फे तक्रार देण्यात आल्यानंतर न्या. झेड. ए. हक यांची नागपूरहून औरंगाबादला तर न्या. डी. एस. नायडू यांची मुंबई येथून गोवा येथे केलेल्या बदलीच्या निर्णयाबद्दलही इंडियन बार असोसिएशनने **'सुप्रिम कोर्ट कॉलेजियम'** आणि मुंबई उच्च न्यायालयाचे चीफ जस्टीस यांचे आभार मानले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, न्या. रंजीत मोरे हे मुंबई उच्च न्यायालयात काम करतांना सामान्य नागरिकांच्या प्रकरणात सुनावणीच घेत नाहीत आणि सुनावणी घेतली तरी कायद्याबाहेर जाऊन श्रीमंतांच्या व विशिष्ट वकिलांच्या बाजूने निर्णय देतात व गरीब, सामान्य जनता आणि बहुतांश सर्वसाधारण वकिल यांच्यावर अन्याय करीत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानामध्ये दिलेल्या कलम १४ नुसार **'कायद्यापुढे सर्व समान, कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान'** या तत्वाचे उघड उल्लंघन न्या. रंजीत मोरे करीत असल्याने तसेच सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या कायद्याच्या विरुद्ध जावून बेकायदेशीर आदेश पारीत करीत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध भादंवि २१८, २१९ आदी कलमा अंतर्गत आणि न्या. कर्णन (२०१७) ७ SCC नुसार कोर्ट अवमानना कायद्यातंर्गत कारवाई करण्यात यावी अशी तक्रार इंडियन बार असोसिएशन तर्फे मा. राष्ट्रपती व मा. सरन्यायाधीश यांच्याकडे केली होती. तसेच गरीब, सामान्य जनता यांना सुद्धा सलमान खान प्रमाणे जलद न्याय मिळावा व हा भेदभाव दूर करण्याकरीता योग्य ती प्रक्रीया त्वरीत राबविण्यात यावी अशी विनंती करण्यात आली होती.

त्यानंतरच्या झालेल्या घडामोडीत सुप्रिम कोर्ट कॉलेजियमने बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजीच्या निर्णयानुसार न्या. रंजीत मोरे यांची बदली मेघालय उच्च न्यायालय येथे केली आहे. याआधी मुंबईच्याच न्या. विजया कापसे तहिलरमाणी यांची भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे मेघालय येथे बदली करण्यात आली होती व त्यांनी राजीनामा दिला होता. त्यावेळी सीबीआयने त्यांच्याविरुद्धच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी दिले होते. यावरून न्या. रंजीत मोरे यांच्या मेघालय येथेच बदली केलेल्या प्रकरणाबद्दल विविध चर्चा न्यायालयीन परिसरात सुरु असून लवकरच फौजदारी कारवाई होऊ शकते अशी चर्चा आहे.

दुसऱ्या प्रकरणात नागपूर येथील न्या. झेड. ए. हक यांच्याविरुद्ध सुद्धा फौजदारी कारवाई करण्याकरीता इंडियन बार असोसिएशनने तक्रार दिली होती. न्या. हक यांनी टी. बागूल प्रकरणात अनेक वकिलांना खोटी व बेकायदेशीर कोर्ट अवमाननाची नोटीस पाठविल्याचे सिद्ध झाल्याने खंडपीठाचे तत्कालीन वरिष्ठ न्यायाधीश व सध्याचे सर्वोच्च न्यायालयाचे जज श्री. भूषण गवई यांनी न्या. हक यांच्याविरुद्ध कडक ताशेरे ओढून त्या वकिलांची माफी मागून ती बेकायदेशीर कोर्ट अवमाननाची नोटीस खारीज केली होती. (2018SCC OnLine Bom 4853). त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी न्या. झेड. ए. हक यांनी अ‍ॅड. निलेश ओझा यांना कोर्ट अवमाननाची नोटीस दिली. त्याबाबत इंडियन बार असोसिएशनने रीतसर तक्रार दाखल करून न्या. हक यांच्याविरुद्ध विविध पुरावे दाखल करून फौजदारी व कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाईची मागणी केली होती.

न्या. हक यांची नागपूरहून औरंगाबाद येथे बदली करण्यात आली आहे. काही वकिलांनी चीफ जस्टीस प्रदीप नंदरजोग यांना ती बदली रोखण्याची विनंती केली होती. ती विनंती फेटाळून लावण्यात आली असून मी माझ्या निर्णयावर ठाम असल्याचे चीफ जस्टीस नंदरजोग यांनी सांगितले.

या संदर्भात इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय समन्वय समितीचे कार्यकारी अध्यक्ष अ‍ॅड. ईश्वरलाल अगरवाल यांनी आभार व्यक्त करणारे पत्र पाठवून जनता व वकील संघाच्या भावना चीफ जस्टीस ऑफ इंडिया यांना कळविल्या आहेत. या प्रकरणी त्वरीत कारवाईची मागणी मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशीदखान पठाण यांनी केली आहे.

*****

# मा.मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. जी.एस. कुलकर्णी यांच्या बेकायदेशीरपणाचे स्टिंग ऑपरेशन; सिडीसह तक्रार दाखल

## ७०० कोटीच्या मालमत्तेमध्ये आरोपींना गैरफायदा पोहचविण्यासाठी भ्रष्टाचार करून बेकायदेशीर आदेश पारीत केल्याचा आरोप



* फौजदारी कारवाईसाठी माननीय राष्ट्रपती व चीफ जस्टीस ऑफ इंडियाकडे तक्रार पुराव्यासह दाखल
* भा.दं.वि. १६७, २१८, २१९, १९२, १९३, ४६५, ४६६, ४६९, ४७१, ४७४, १२० (ब) अंतर्गत कारवाईची मागणी
* विविध वकिल संघटना व इंडियन बार असोसिएशन तर्फे आरोपी न्यायाधीशास त्वरित बडतर्फ करण्याचीही केली मागणी
* आरोपी वकिल एस.यु.कामदार यांची सनद रद्द करण्याची मागणी

***विशेष प्रतिनिधी/ २३ फेब्रुवारी***

**मुंबई :** येथील मालाड भागात एकूण ७०० कोटी रुपये किमतीची ४ एकर जागा बळकाविण्यासाठी खोटे व बनावट कागदपत्रे बनवून जमीन मालकाची व न्यायालयाची फसवणूक करणारा खंडेलवाल इंजिनिअरिंग कंपनीचा मालक संजय पटेल व त्याच्या कटात सामील अ‍ॅड. एस. यु. कामदार यांना गंभीर गुन्ह्यातून वाचविण्यासाठी पदाचा दुरुपयोग करून बेकायदेशीर आदेश पारित करून त्या आदेशात खोटा व चुकीचा तपशील न्या. जी.एस. कुलकर्णी यांनी लिहीला असल्याचे स्टिंग ऑपरेशनमध्ये सिद्ध होत असून आरोपी न्यायाधीश जी. एस. कुलकर्णी यांच्याविरुद्ध भादंवी १६७, २१८, २१९, १९२, १९३, ४६५, ४६६, ४६९, ४७१, ४७४, १०९, १२० (ब) आदी कलमाअंतर्गत फौजदारी कारवाई करून त्यांना त्वरित बडतर्फ करावे आणि न्या. कर्णन प्रमाणे न्या. कुलकर्णी यांना सुद्धा सुप्रिम कोर्टाच्या आदेशाची अवमानना केल्याप्रकरणी ६ महिने तुरुंगात पाठवावे. अशी मागणी तक्रारकर्त्याने केली असून त्यांच्या या मागणीला विविध वकिल संघटनांनी व इंडियन बार असोसिएशनने पाठिंबा दिला असल्याची माहिती आहे. तसेच मनसेचे पदाधिकारी वासुदेव पाटील यांनीही या प्रकरणी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की मालाड येथील भूमिपुत्र विठ्ठल सोवार कोळी यांना शासनाने मालाड येथील ४ एकर जागेचा मालक घोषित केले होते. विठ्ठल कोळी यांच्या मृत्यूनंतर ती जागा बळकाविण्यासाठी आरोपी बिल्डर नामे संजय पटेल याने त्याच्या सहा वारसांपैकी अशिक्षित तीन वारसांचे इंग्रजीत लिहीलेल्या अर्जावर अंगठ्याचे ठसे घेऊन उच्च न्यायालयात खोटी माहिती दिली कि, मृत विठ्ठल कोळी यांना फक्त तीन वारस होते व त्यांनी तडजोड करून जागा संजय पटेलला दिली आहे. त्या खोट्या तडजोड नाम्याच्या आधारावर आरोपीने न्यायालयाकडून आदेश मिळवून घेतले व त्यानंतर अशी कहाणी तयार केली कि त्याचा

(उर्वरित पान २ वर)

